
www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

दैं. युवक आधार करीता प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 239 वा बुधवार दि. 14 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514





## अविनाश कोळी यांची भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड

दैनिक युवक आधार
पनवेल(प्रतिनिधी)

संघटन कौशल्य, कार्यक्षमता व पक्षशिस्त म्हणून ओळखले जाणारे अविनाश कोळी यांची भारतीय जनता पार्टीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड करण्यात आली आहे. प्रदेश भाजपच्यावतीने आज राज्यातील जिल्हाध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली असून पुढील वाटचालकरीता शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत. त्यांच्या पुनर्नियुक्तीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही निवड अत्यंत फलदायी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रातील विविध जिल्हाध्यक्षांच्या निवड प्रक्रिया नुकतीच



पार पाडली आहे. पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी व स्थानिक पातळीवर प्रभावी नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने या निवडी करण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता व कार्यक्षमता राखण्यासाठी पक्षाने ठोस निकष निश्चित केले, त्यामध्ये जिल्हाध्यक्ष पदासाठी ६० वर्षांखालील उमेदवारांनाच प्राधान्य देण्यात आले आहे. अविनाश कोळी यांचे संघटनात्मक कार्यासाठी नियोजन उत्तम प्रकारचे असते. पक्षाचे ध्येय धोरण आणि उपक्रमे नेहमीच यशस्वी करत त्यांनी यापूर्वीही जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी चोख पार पाडली आहे. तसेच निवडणुकाही जिंकण्यात त्यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. त्याचबरोबरीने संघटनात्मक जबाबदारीने काम केले आहे. त्यामुळे त्यांची महाराष्ट्र प्रदेश भाजपने पुनर्निवड जाहीर केली आहे.




## भटवाडी घाटकोपरमध्ये मिनी नाट्यगृहासाठी श्री विकास वायाळ यांची महत्वपूर्ण मागणी

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**



घाटकोपर (भटवाडी), येथील कलाप्रेमी तरुणांना व स्थानिक कलाकारांना आपले कला सादर करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष, अभिनेते, लेखक व दिग्दर्शक श्री विकास वायाळ यांनी पुढाकार घेतला आहे. यासाठी त्यांनी स्थानिक नगरसेविका सौ. अश्विनी दीपक हांडे, कार्यसम्राट आमदार श्री राम कदम साहेब आणि कार्यसम्राट खासदार श्री संजय दिना पाटील साहेब यांना भटवाडी घाटकोपर परिसरात ७५ ते १०० आसन क्षमतेचे मिनी नाट्यगृह आपल्या विकास निधीतून बांधून देण्याची विनंती केली आहे. श्री वायाळ यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, सदर मिनी थेटर नाट्यगृहाचा फायदा हा महाराष्ट्रातील व महाराष्ट्र बाहेरील मुंबईत येणाऱ्या कलाक्षेत्र संबंधित सर्वांना होईल व त्यानिमित्ताने अनेक रोजगार उपलब्ध होतील "भटवाडी, घाटकोपर परिसरात अनेक होतकरू कलाकार, नाट्य व सांस्कृतिक संस्था कार्यरत आहेत. मात्र त्यांच्या कला सादरीकरणासाठी सुसज्ज व योग्य जागेचा अभाव आहे. हे मिनी नाट्यगृह स्थानिक कला-संस्कृतीला चालना देण्यासोबतच, तरुण पिढीला सकारात्मक वळण देईल." या नाट्यगृहात स्थानिक कार्यक्रम, वर्कशॉप, लघुपट प्रोजेक्शन, सामाजिक उपक्रम, महिला व युवांसाठी विविध सांस्कृतिक स्पर्धा, तसेच चित्रपट व रंगभूमीच्या नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देणारे उपक्रम राबवले जातील. "ही मागणी केवळ एक वास्तू उभी करण्यापुरती मर्यादित नाही, तर ती घाटकोपर परिसरातील सांस्कृतिक चळवळ मजबूत करण्याचा एक प्रयत्न आहे," असे श्री वायाळ यांनी स्पष्ट केले.

## "मानसी हांडेचे आशियाई स्पर्धेत कास्यपदक, जोगेश्वरीची 'गोल्डन गर्ल' ठरली"

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई - (जोगेश्वरी)** 'जोगेश्वरीची गोल्डन गर्ल' मानसी हांडेची आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत घवघवीत कामगिरी, भारतासाठी कास्यपदकाची कमाई देहरादून (उत्तराखंड) येथे नुकत्याच पार पडलेल्या 2025 आशियाई सब-ज्युनिअर व ज्युनिअर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत जोगेश्वरीच्या मानसी संजय हांडे हिने भारताचे प्रतिनिधित्व करत कास्यपदक पटकावले. भारतासाठी मिळवलेले हे मान्यताप्राप्त यश तिच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ आहे. या स्पर्धेसोबतच मानसीने राष्ट्रीय स्तरावरील पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ४ सुवर्ण पदके जिंकण्याचा मान पटकावला आहे. जोगेश्वरीतील एकमेव अशी खेळाडू आहे जिने इतक्या मोठ्या प्रमाणावर यश संपादन केले असून, 'गोल्डन गर्ल ऑफ जोगेश्वरी' म्हणून ती प्रसिद्ध आहे. गेल्या सहा वर्षांपासून मानसी ट्रू पॉवर जिममध्ये कोच संकेत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर सराव करत आहे. शारीरिक शिक्षणात B.P.Ed पदवी प्राप्त केलेली मानसी सध्या निकुंज विद्यालयात शारीरिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत असून, जोगेश्वरीतील नवोदित खेळाडूंना मानसीकडून प्रेरणा मिळत आहे.





## पनवेलमध्ये प्रथमच तीन दिवस 'आंबा महोत्सव'

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर याच्या संकल्पनेतून भारतीय जनता पार्टी पनवेल शहरच्यावतीने दिनांक १६ ते १८ मे पर्यंत पनवेलमध्ये प्रथमच 'आंबा महोत्सव' तसेच महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवानिमित्त सांस्कृतिक, मनोरंजन आदी कार्यक्रमे आयोजित करण्यात आले आहेत.

शहरातील डॉ. पटवर्धन हॉस्पिटल समोरील गुजराती शाळेच्या मैदानावर तीनही दिवस आंबा महोत्सव होणार आहे. या महोत्सवाअंतर्गत शुक्रवार दिनांक १६ मे सायंकाळी ६ वाजता महिलांसाठी 'खेळ खेळूया साऱ्याजणी चला जिंकूया अस्सल पैठणी', शनिवार दिनांक १७ मे रोजी सायंकाळी ०७ वाजता 'अभंग रिपोस्ट' तर रविवार दिनांक १८ मे ला संगीत, नृत्य, कलेचा संगम असलेला 'वारसा संस्कृतीचा' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या महोत्सवाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रम प्रमुख माजी नगरसेविका रुचिता लोंढे, भाजप पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव यांनी केले आहे.

## शिवकथा व किर्तन महोत्सवाची सांगता..

### दिगांबर शिवाचार्य महाराज यांचे किर्तन..

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूर अनंतपाळ :** शहराचे ग्रामदैवत श्री अनंतपाळ महाराजांच्या यात्रे निमित्ताने दिनांक 7 मे ते 11 मे दरम्यान स्वरसम्राट कुमारसागर स्वामी महाराज लोहारेकर यांची भव्य शिवकथेचे आयोजन करण्यात आले होते या शिवकथेची सांगता प्रसंगी राष्ट्रसंत डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांचे उत्तर अधिकारी युवा संत सदगुरू राजशेखर गुरू शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली या वेळी



शिरूर अनंतपाळ मठाचे मठाधिपती शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती या प्रसंगी लातूर जिल्ह्याचे खासदार डॉ शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते आरती करण्यात करून उपस्थित भाविक भक्तांना खा.डॉ.काळगे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच किर्तन महोत्सवात मारोती महाराज भालके,सौ आश्विनीताई स्वामी उदगीरकर, राजेश्वर स्वामी लाळीकर,अमोल महाराज बनवसकर यांच्या किर्तन संपन्न झाले या किर्तन महोत्सवाची सांगता वेदांताचार्य दिगांबर शिवाचार्य महाराज वसमतकर यांच्या किर्तनाने सांगता करण्यात आली या वेळी अँड.संभाजीराव पाटील, डॉ.बाळासाहेब पाटील, अँड.जयश्रीताई पाटील, उमाकांत देवंगरे उपस्थित होते यात्रे निमित्ताने किर्तन व शिवकथा महोत्सवाचे आयोजन सोमेश्वर तोंडारे,महादेव आवाळे,संतोष शेटे, अशोक कोरे,व्यंकट हांद्राळे,शिवदास उंबरगे, आसिफ उजेडे,संभाजी पारशेटे,परमेश्वर सांगवे, कपिल धुमाळे यांच्या वतीने करण्यात आले होते या वेळी मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## . संभाजीनगर विभाग कुराश प्रशिक्षण शिबीर जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय**
**संपादक प्रा जगन्नाथ रासवे**

कुराश असरसोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने बीड जिल्हा कुराश असरसोसिएशन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने
छ. संभाजीनगर विभाग कुराश प्रशिक्षण दिनांक 10 ते 12 मे 2025 दरम्यान जिल्हा क्रीडासंकुल बीड येथे सपन्न झाले. सदरील शिबिरामध्ये खेळाडू, प्रशिक्षक व पंच यांचे प्रशिक्षण व परीक्षा घेण्यात आली. यामध्ये कुराश या खेळाचा इतहास, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य संघटना कार्य. शालेय व राज्य संघटना आयोजित स्पर्धा. कुराश या खेळाची एशियन गेम स्पर्धेची माहिती तसेच कुराश या खेळाचे तांत्रिक कौशल्य प्रशिक्षण.
या शिबिरामध्ये प्रामुख्याने दिनकर थोरात, भानुदास आंदुरे, श्रीराम इंगळे, योगेश जाधव यांनी तांत्रिक पंच प्रशिक्षण घेतले व पंच परीक्षा पास झाले राज. तसेच स्वराज सुरवसे, वेदांत सुरवसे, ज्ञाश्वर कदम, खाताने आदित्य, आर्यन जिरे, प्रसाद वडखेलकर, सागर इंगळे, ईशान वडखेलकर, प्रशांत निर्मळ यांनी कुराश या खेळाचे तांत्रिक प्रशिक्षण घेतले.
राज्य संघटनेच्या नियमानुसार कुराश प्रशिक्षण शिबिर पूर्ण केलेले व रजिस्ट्रेशन केलेले खेळाडू स्पर्धा मध्ये भाग घेण्यास पात्र राहतील. या या शिबिरास कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे अध्यक्ष. अंकुश नागर , व सचिव. शिवाजी साळुंके यांनी मान्यता दिली. मा




विद्यागर. बीड जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी जिल्हा क्रीडा संकुल येथे शिबीर आयोजनास मान्यता दिली.मा. रेवण शेलार. तालुका क्रीडा अधिकारी यांनी शिबीर आयजनास मार्गदर्शन केले.या शिबिराचे आयोजन बीड जिल्हा कुराश असरसोसिएशन, अध्यक्ष. दिनकर थोरात,सचिव. सौ. संगीता आंदुरे व सहसचिव. सौ.नम्रता शेलार (कोलुगडे)यांनी केले. तसेच परीक्षक म्हणून दत्तात्रय व्यवहारे (आंतरराष्ट्रीय दोन स्टार पंच) यांनी काम पहिले. प्रशिक्षण देण्यासाठी विभाग प्रमुख. शरद आंदुरे (आंतरराष्ट्रीय एक स्टार पंच ) व संतोष सुरवसे (आंतरराष्ट्रीय पंच. एक स्टार पंच) यांनी काम पहिले.या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कुराश संघटक. पाठण अ. गफ्फार,जगन्नाथ रासवे खेळाडू, पालक यांचे योगदान महत्वाचे आहे.



## संपादकीय

### स्वाभिमानाची प्रेरणा देणारा छावा महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली. औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला. औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते. त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला.यालाच म्हणतात "घर का भेदी लंका ढाये"१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही. त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत. पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले.औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत राहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?"याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे. याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे. धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
( स्वतंत्र पत्रकार) नागपूर.

# अलिबाग तालुका रहिवाशी संघ पनवेल, स्नेह मेळावा आणि गुणगौरव समारंभ संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**कळंबोली, वार्ताहर**




अलिबाग तालुका रहिवाशी संघ पनवेल, स्नेह मेळावा आणि गुणगौरव समारंभ दि. 27 एप्रिल 2025 रोजी अतिशय सुंदर, नीटनेटका आणि सुनियोजित पणे अनेक अलिबागकर यांच्या साक्षीने दिमागदार स्वरूपात संपन्न झाला. गेली अनेक वर्षे ही संघटना गुणवंत विद्यार्थी तसेच विशेष कामगिरी केलेल्या नागरिकांचे सन्मान करत आली आहे. या कार्यक्रमाला संघटनेचे प्रमुख आधारस्तंभ, कार्याध्यक्ष माननीय श्री. सतीश पाटील साहेब, अध्यक्ष माननीय श्री. आल्हाद पाटील साहेब, उपाध्यक्ष श्री. श्रीकांत ठाकूर साहेब, उपाध्यक्ष श्री. महेंद्र वावेकर साहेब, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव श्री. दत्तात्रेय वेटकोळी साहेब, अँड. श्री. तेलगे साहेब, श्री. अर्जुन गावंड सर, श्री. हेमंत पाटील सर, श्री. रामचंद्र पाटील, श्री. भोपी साहेब, श्री. श्रीकांत पाटील, हास्य सम्राट श्री. संजीवन म्हात्रे, श्री. पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सौ. सुशीला घासे, सौ. अलका कोळी तोडणकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. गणेशपूजन, सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित असलेल्या अलिबागकर बांधवांनी पहिल्यांदा पहेलगाम येथे अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या तसेच संघटनेतील मृत्यू पावलेल्या नातेवाईकांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. आल्हाद पाटील यांच्या प्रास्ताविक भाषणाने संमेलनाची सुरुवात झाली. आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक भाषणामध्ये अलिबाग भवन निर्मितीसाठी सर्वांनी झटून काम करावे व लवकरात लवकर ही वास्तू उभी करण्यात यावी यासाठी आवाहन करण्यात आले. अलिबाग भवन निर्मितीसाठी 'प्रेम करावं पण जपून' हे नाटक वासुदेव बळवंत फडके या नाट्यगृहात आयोजित केले आहे त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन जास्तीत जास्त निधी संकलन व्हावे असेही आवाहन संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. आल्हाद पाटील साहेब यांनी केले.. त्यानंतर दहावी, बारावी, पदवीधर, इंजिनिअर आणि नामांकित क्षेत्रात काम करत असलेल्या अनेक विद्यार्थ्यांचे ट्रॉफी, पुष्पगुच्छ व शाल देऊन त्यांच्या आई-वडिलांसमवेत त्यांना गौरविण्यात आले. तसेच आपापल्या सेवा क्षेत्रात ज्यांनी उल्लेखनीय कार्य केले त्यांनाही गौरविण्यात आले. या समारंभात श्री. चिन्मय विजय झिंजे या तरुण मुलाने वयाच्या 12 व्या वर्षी अचानक आलेल्या आपल्या अपंगत्वावर मात करून जे काही यश मिळविले त्याचे आत्मकथन ऐकताना सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले. सर्वांनी टाळ्या वाजवून त्यास आशीर्वाद दिले. या सर्व गुणीजनांनी आपापल्या क्षेत्रात मिळविलेले गुण, माहिती, अनुभव, हे सर्व पाहून आणि ऐकून अलिबागकरांकडे एवढे टॅलेंट आहे याचा अभिमान वाटला असे मान्यवरांनी आपल्या भाषणात सांगितले तसेच अलिबागकरांचे नाव भविष्यात राज्य पातळीवर, केंद्रस्तरावर, त्याचबरोबर जागतिक पातळीवर नेऊन ठेवतील हा विश्वास आहे असे म्हणून त्यांनी सर्व गुणी मुलांचे मनापासून कौतुक आणि अभिनंदन केले. तसेच त्या सर्वांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र पालवे सर यांनी उपलब्ध करून दिलेला सर्व सोयींनी युक्त असा सुंदर हॉल त्याचबरोबर श्री. जगदीश धुळे यांची संगीत मैफिल आणि हास्य सम्राट श्री. संजीवन म्हात्रे यांचे विनोदातून प्रबोधन हा दुर्मिळ योगायोग... तसेच सर्व पदाधिकारी, संचालक, सभासद, सपत्नीक उपस्थित राहून त्यांनी समारंभाला एक वेगळाच उत्साह आणला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रसाद म्हात्रे आणि श्री. अविनाश ठाकुर यांनी त्यांच्या शैलीत केले. छायाचित्रणाची जबाबदारी दैनिक पुण्य प्रतापचे संपादक श्री. अविनाश पाटील व श्री. संदेश कोठेकर यांनी सांभाळली. या यशस्वी आयोजनात श्री. आल्हाद पाटील, श्री. निवृत्ती पाटील, श्री. संजय मोकल, श्री. मच्छिंद्र पाटील, श्री. भालचंद्र पाटील, श्री. प्रसाद म्हात्रे, श्री. अविनाश पाटील, श्री. राकेश पाटील, श्री. विश्वास ठाकूर, श्री. विश्वनाथ पाटील, श्री. सावळाराम पाटील, श्री. सतीश पाटील ( कुरूळ ), सौ. सुशीला घासे, सौ. अलका कोळी तोडणकर, सौ. निलिमा झिंजे, सौ अंजली पाटील, सौ. मेघा पाटील, सौ. जागृती म्हात्रे, सौ. शितल तेलगे यांजबरोबर इतर सर्व महिला भगिनी ज्यांनी लक्षवेधी रांगोळ्या काढल्या, स्टेजची उत्तम व्यवस्था पाहिली त्यांचाही मोलाचा वाटा आहे. सरते शेवटी आपल्या गोड आवाजात स्नेहा पाटील यांनी मान्यवरांचे, सत्कार मूर्ती आणि उपस्थित असलेल्या सर्व अलिबाग करांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. नंतर सर्व अलिबाग करांनी जेवणाचा मनमुराद आस्वाद घेतला.

# द्रोणागिरी स्पोर्टस उरण मैदान मागणीसाठी बोकडविडा गाव पु-या ताकदीने उतरणार...

### सूर्यकांत पाटील , अध्यक्ष, बोकडविडा.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

बोकडविडा गाव हे आंदोलनात नेहमीच अग्रेसर राहिला आहे, यावेळी द्रोणागिरी स्पोर्टस आणि कोमसापच्या जागरातून उरण मैदानासाठी जे आंदोलन उभे केले आहे. त्यासाठी बोकडविडा गाव पु-या ताकदीने उतरणार आहे,असे गाव अध्यक्ष सूर्यकांत पाटील यांनी ग्रामस्थांच्या बैठकीत जाहीर केले.याचवेळी जेएनपीटी माजी विश्वस्त भूषण पाटील म्हणाले, तालुक्यात १०/१२ दिवस कोमसाप कवींच्या जागरातून आणि द्रोणागिरी स्पोर्टसच्या माध्यमातून सभा,बैठकातून मोठी जागृती झाली आहे. सिडकोला आता उरणकरांच्या भावना विचारात घेऊन न्याय द्यावा लागेल.द्रोणागिरी स्पोर्टस अध्यक्ष महादेव घरत यांनी आंदोलनाची पूर्ण भूमिका मांडून आता न्याय मिळेपर्यंत आंदोलन चालू ठेवणार हे स्पष्ट केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवान पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात हा लढा कणभर ही उरणकर कमकुवत होऊन देणार नाही.आता द्रोणागिरी स्पोर्टस आणि कोमसाप सोबत उरणकर राहणार.

प्रास्ताविक आणि कविता जागर यावर विचार मांडताना आगरी बोलीतील पसायदानाने आंदोलनाचे मनोबळ रायगड भूषण प्रा एल बी पाटील यांनी स्पष्ट केले. पाहुण्यांचे स्वागत जयवंत पाटील यशवंत ठाकूर आणि मंदिर ट्रस्ट अध्यक्ष मनोज पाटील यांनी करून बैठकीचे उत्तम नियोजन केले.संदिप पाटील यांनी आपल्या भाषणात गावाचा इतिहास सांगतांना गावकरी आक्रमक राहणार हे सांगितले. या बैठकीत उपसरपंच धृव पाटील, कृष्णकांत पाटील, हेमलता पाटील, स.ही. पाटील, चंद्रकांत पाटील,किरण घरत, किशोर घरत, कवींच्या जागरात हेमंत पाटील, भगवान म्हात्रे,एल बी सर यांनी कविता सादर केल्या.इ.प्रमुख उपस्थितीत महिलांची संख्या मोठी होती.पाहुण्यांचे आभार जयवंत पाटील यांनी मानले.



# पनवेल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत तिन्ही शाळेंनी मिळवला दहावीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश

**दैनिक युवक आधार**



यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी

**पनवेल वार्ताहर** : सालाबादप्रमाणे यंदाही दहावीचा निकाल आज जाहीर झाला. यामध्ये पनवेल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत तिन्ही शाळेंनी दहावीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवले आहे. पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांना दरवर्षी शिक्षणासाठी सर्वोतोपरी मदत केली जाते. यातूनच विद्यार्थी मनापासून शिक्षण घेऊन चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत असतात. यंदाही पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या पनवेल येथील याकूब बेग हायस्कुलचा दहावीचा निकाल ९६.४ टक्के लागला असून एकूण १३९ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते. त्यापैकी १३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. यामध्ये १९ विद्यार्थी उत्कृष्ठ, ४९ विद्यार्थी प्रथम क्षेणीत व ५३ विद्यार्थी द्वितिय क्षेणीत पास झाले आहेत. त्यामध्ये आंबेकर सादिया आसिफ हिने ९२.४ टक्के मिळवून प्रथम, खान शाहीन फारुख ९०.२ टक्के द्वितीय तर दळवी आशिया हर्षद ८६.४ टक्के मिळवून शाळेत तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच तळोजा येथील नॅशनल उर्दू हायस्कुलचा निकाल ९८.४ टक्के लागला असून शाळेतून १०८ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यापैकी १०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये २० विद्यार्थी उत्कृष्ठ, ३३ विद्यार्थी प्रथम क्षेणीत व ४७ विद्यार्थी द्वितिय क्षेणीत पास झाले आहेत. यात पटेल मारियम इलियाज ९७.६ टक्के मिळवून प्रथम, खामकर रिझा जुबेर ९२.२ टक्के द्वितीय तर खामकर जैनाब अब्दुल सलाम ९१ टक्के मिळवून शाळेत तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्याचप्रमाणे तालुक्यातील बारापाडा येथील अँग्लो उर्दू हायस्कुलचा निकाल १०० टक्के लागला असून यात अब्दुल्ला मुझाबीर रसालकर व नौफ तौसिफ़ दळवी ८७.४ टक्के तर नवाज अन्वर लांबतुरे ८६.४ मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. यासर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी, चेअरमन आसिफ करेल, उपाध्यक्ष मुकीदभाई काझी, सचिव नूर पटेल, आलिम पटेल यांनी अभिनंदन केले आहे. त्याचप्रमाणे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व शाळेतील विद्याथ्यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटणे येथील विद्यार्थ्यांची 100 मी स्पर्धेत देशात चौथा क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**





पाटणे : पंडित जवाहलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थिनी,कु. महेश्वरी सुरेश त्रिभुवन ची पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम दिल्ली येथे 02/04/25 ते 08/04/25आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत उल्लेखनीय अशी कामगिरी केलेली आहे सर्व राज्यातून प्रथम आलेले खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेले होते त्या स्पर्धेत महेश्वरी त्रिभुवन 14 वर्षाच्या गटात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले व संपूर्ण भारतात चौथा क्रमांक मिळविला. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे माननीय शिक्षण मंत्री भुसे साहेब यांनी मालेगाव येथे तिचा सत्कार आयोजित केला व तिच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक केले आणि बक्षीस स्वरूपात तिला दहा हजार रुपये दिले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाप्रसंगी माननीय शिक्षण मंत्री दादा भुसे विद्यालयाचे प्राचार्य एस के घोंगडे क्रीडाशिक्षक राकेश खैरनार (आंतराष्ट्रीय खेळाडू) शालेय समितीचे चेअरमन दौलत बागुल पाटणे गावाचे सरपंच संजय यशोद व सर्व ग्रामपंचायत सदस्य/ग्रामस्थ उपस्थित होते.तसेच महात्मा फुले शिक्षण संस्थेचे सर्व पदधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक एस के घोगडे पर्यवेक्षक बागुल सी एस सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी महेश्वरीचे कौतुक केले

# सीबीएसई दहावीच्या निकालात स्व. माणिक पोदार लर्न स्कूलचा (CBSE) सलग चौथ्या वर्षी 100% निकाल..

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी**
**रणजितसिह ठाकुर**

स्व. माणिक पोदार लर्न स्कूलच्या माध्यमातून मागील काही वर्षापासून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याची प्रक्रिया सुरू आहे. शाळेचे माध्यमातून विद्यार्थी केंद्रित शिक्षण देण्याचे कार्य होत आहे. म्हणूनच अगदी कमी वर्षांमध्ये शाळेने आपल्या नावाची उंची गाठलेली आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी शिक्षण या शाळेच्या माध्यमातून मिळत आहे. स्वर्गीय माणिक पोदार स्कूल दर्जेदार शिक्षणाबरोबरच आदर्श विद्यार्थी घडविण्याचे काम करत आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच समाजामध्ये राहण्यासाठी आवश्यक गोष्टी. नीती मूल्ये आत्मसात करण्यासाठी शाळा नेहमीच अग्रेसर आहे. म्हणूनच अगदी कमी वर्षांमध्ये शाळेने शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळी उंची गाठलेली आहे. व आपल्या ज्ञानदानाच्या कार्यातून आदर्श विद्यार्थी घडवत आहे. तसेच रिसोड व सेनगाव सारख्या भागात शैक्षणिक क्षेत्रामध्ये नव संजीवनीचे काम करत आहे. स्व. माणिक पोदार लर्न स्कूल चा सलग चौथ्या वर्षीही CBSE बोर्डाचा 100% निकाल लागला आहे. यावर्षी वर्ग 10 वी साठी एकूण 29 विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी 90 टक्क्याच्या वर 3 विद्यार्थी, 80 टक्याच्या वर 9 विद्यार्थी उत्तीर्ण झाले,तसेच याबरोबर इतरही विद्यार्थी चांगल्या गुणांनी 100 टक्के उत्तीर्ण त्यांनी स्वतः चे, पालकांचे व शाळेचे नाव उंचावले. यामध्ये कार्तिक नवलकुमार जेठलिया हा विद्यार्थी 95.67 टक्के मिळवून शाळेमधून प्रथम आला, स्नेहा विश्वास जमधाडे 94 टक्के, वेदांत अंबाडकर 92.33 टक्के, तृप्ती पोपळघट 89.50 टक्के, प्राजक्ता गोरे 88.50 टक्के, चिराग मापारी 88.33 टक्के,नेतल भारूका 85.67 टक्के, रिया डोखळे 85.67 टक्के, अक्षय वाघ 84.67 टक्के, आदित्य जाधव 83.17 टक्के, नम्रता सरकटे 81.67 टक्के, सुरज पायघन 80.83 टक्के घेऊन उत्तीर्ण झालेत.अगदी कमी कालावधी मध्ये शाळेने उंच भरारी घेऊन वाशीम व हिंगोली जिल्ह्यात नावलौकिक मिळवला आहे. याची परिसरात व पालकांमध्ये चर्चा होत आहे.त्यामधून सर्व विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन हे यश संपादक केले आहे.विद्यार्थ्यांनी याचे श्रेय शिक्षक,शाळा,पालक यांना दिले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांचे नेत्रदिपक यश पाहून शाळेचे अध्यक्ष विनायक जाधव, सीमा मापारी, प्राचार्य हर्षल वासेवाल,मुख्याध्यापिका नर्गिस अंजुम,तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांनी सर्व विद्यार्थी व पालक यांना शुभेच्छा दिल्यात..




**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# नंदलाल पाटील कापगते विद्यालय, साकोली येथील दहावीच्या विद्यार्थ्यांना घवघवीत यश!

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा-** साकोली येथील नंदलाल पाटील कापगते विद्यालय साकोली या शाळेने यंदाही दहावीच्या निकालात यशाची परंपरा कायम ठेवत उत्तुंग यश संपादन केले आहे. शाळेचा एकूण निकाल 90.44 % लागले असून, अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवून शाळेचे नाव उज्वल केले आहे.

प्राविण्य प्राप्त एकूण विद्यार्थी - 23 , प्रथम श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी- 36, द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी - 47 विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. कु.अनिता राजेश्वर घरत हिने 92.20 % गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच कु. निधी अरविंद सोनवणे हिने 89.40, व कु.डिंपल प्रदीप हत्तीमारे हिने 89.00 अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. अनेक यशस्वी विद्यार्थ्यांनी देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुख्याध्यापिका श्रीमती आर. बी. कापगते व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या एकत्रित प्रयत्नातून हे यश साध्य झाल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले. शाळा व्यवस्थापन समिती, विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# भंगाराच्या दुकानात सरार्स चोरीचा माल

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



इंदापूर तालुक्यातील सणसर गावालगत चालू असलेल्या बांधकामावरील लोखंडी स्टील एकाच आठवड्यात दोन वेळा चोरून नेल्याची घटना घडली आहे.आणि चोरीला गेलेले लोखंडी स्टील एका भंगार दुकानात सापडले असल्याची चर्चा सध्या सणसर गावात जोरदार चालू आहे भंगार गोळा करण्यासाठी दुकानात काम करत असलेल्या महिलांनी चालू असलेल्या बांधकामावरून लोखंडी स्टील चोरून घेऊन गेल्या आणि भंगार दुकानात विकण्यात आल्या आहेत.अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर बांधकाम मालक यांनी स्वतः भंगार दुकानात जाऊन पाहिले असता त्यांच्या बांधकामा वरील चोरीला गेलेलं लोखंडी स्टील त्यांच्या निदर्शनास आले आणि त्यांनी संबधीत दुकान मालकास या चोरीच्या स्टील विषयी माहिती विचारली असता दुकान मालकाची बोबडी वळली व चोरी करणाऱ्या महिला यांनी लगेच तेथून पळ काढला आणि उडवाउडवीची उत्तरे देऊन हे स्टील भंगार गोळा करणाऱ्या महिलांनी आमच्या दुकानात विकलं असल्याची माहिती सांगण्यात आली. अश्याच प्रकारे मागील काही दिवसापूर्वी सुद्धा कारखान्याच्या पाठीमागील बाजूस सणसर येथील शेतकऱ्याच्या विहिरीवरील बांधकाम चालू असताना लोखंडी स्टील चोरीला गेले होते.अश्याच प्रकारे सणसर भागातील लाईटचे पोल,विदयुत तारा,शेतकरी यांच्या शेतातील अवजारे अशी अनेक वस्तू चोरीच सामान भंगार दुकानात विकत घेतले जात असल्याची चर्चा चालू आहे.




**श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद ता.रिसोड**
S.S.C.परीक्षा फेब्रुवारी/मार्च मी 2025 परीक्षा निकाल एकूण विद्यार्थी संख्या:158 पैकी 153 उत्तीर्ण झाले विद्यालयाचा एकूण टक्केवारी
**निकाल :** 97.45% सेमी 99 उत्तीर्ण :- 100%
**मराठी:** 54 उत्तीर्ण प्रथम: चि.अथर्व दिपकराव देशमुख 91.20%, प्राविण्य श्रेणी: 108 असून
एस.एस.सी.परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन.
अभिनंदन कर्ते
श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद चे अध्यक्ष मा.श्री नानासाहेब देशमुख
प्राचार्य सुभाष उमाळे प्राध्यापक,प्राध्यापिका शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद श्री शिवाजी परिवार वाकद

# नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेसा आराम आणि सकारात्मक विचार महिलांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे- माजी महापौर कविता चौतमोल

## नवीन पनवेलमध्ये जागतिक मातृदिन उत्साहात साजरा

## महिलांसाठी 'हार्टवॉर्मिंग सुपर मॉम कॉन्टेस्ट २०२५'चे यशस्वी आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल:वार्ताहर**

नुकत्याच झालेल्या जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून परिणिता इव्हेंट्स प्लॅनर, ड्रीम डेव्हलपर्स आणि ग्रेसफुल हँड्स ट्रस्ट ई-१४३२ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ११ मे) स्पाईस वाडी हॉटेल नवीन पनवेल येथे 'हार्टवॉर्मिंग सुपर मॉम कॉन्टेस्ट २०२५' हा एक आगळावेगळा 'मदर्स डे इव्हेंट' आयोजित करण्यात आला होता. मातृत्वाचे सामर्थ्य दाखवणे हा यामागील उद्देश होता. यावेळी मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अर्थशास्त्र विषयाच्या व्याख्याता, सामाजिक कार्यकर्त्या पायल मधोक यांनी व ग्रेसफुल हँड्स ट्रस्ट




ई-१४३२ फाउंडेशनच्या अध्यक्षा नॅन्सी कुकरेजा यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिलांचे आरोग्य आणि निरोगीपणाचे महत्त्व आपल्या मनोगतातून अधोरेखित केले. मातृदिन हा मातृत्व, मातृबंध आणि समाजातील मातांचा प्रभाव यांचा सन्मान करणारा उत्सव आहे. मातृत्वाचा प्रवास हा एक खास प्रवास आहे आणि तो आनंद आणि जबाबदारी दोन्हीसह येतो असे सांगून नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेसा आराम आणि सकारात्मक विचार हे महिलांच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे असल्याचे डॉ.कविता चौतमोल यांनी सांगितले. कार्यक्रमाला मराठी अभिनेत्री अर्चना पवार आणि स्वप्नाली केळजी यांनी देखील कार्यक्रमाला हजेरी लावली. या कार्यक्रमात विजेत्या अपराजिता सिंग, प्रथम उपविजेत्या अरुंधती बनसोडे, सर्वोत्कृष्ट आई-मुलगी जोडी शिल्पी सिन्हा, श्रेष्ठ सिन्हा, उत्कृष्ट हेअर स्टायलिस्ट सरिता म्हात्रे, उत्कृष्ट वेशभूषा साकारणाऱ्या दीपाली पाटील यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. मातृदिनानिमित्त महिलांचा सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल मान्यवरांसह उपस्थितांनी आयोजकांचे आभार मानले. तसेच कार्यक्रमासाठी योगदान दिल्याबद्दल ड्रीम्स डेव्हलपर्सचे संजय शर्मा यांचे आयोजकांच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले. नुकत्याच झालेल्या काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांना आणि शहिद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तब्बल 25 वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोडः** - सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील यशवंत विद्यालय येथे 1999-2000 सालच्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा तब्बल 25 वर्षानंतर स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी खेळीमेळीच्या वातावरणात जुन्या आठवणींना सर्वांनी उजाळा दिला. यावेळी तेजराव जंजाळ, आकाशराव पांढरे, मुरलीधर जंजाळ, ज्ञानेश्वर काकडे , सुरेश घोडके, रामकिसन गायकवाड, विष्णू फरकाडे, मनोज देशमुख, दगडूबा सपकाळ, हिम्मतराव दांडगे, संतोष पालोदकर,बाबु पठाण,पांडुरंग दणके या तत्कालीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती . सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी शिक्षकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.या सर्व माजी विद्यार्थ्यांनी शाळेला बेंचची भेट दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर काकडे यांनी सुखी जीवनासाठी व्यस्त जीवनात वेळ काढून एकमेकांना भेटायला हवे असे मत व्यक्त केले तसेच व्यवसाय किंवा नोकरी करणाऱ्या बरोबरच शेतकऱ्यांनी स्वतःला मालक समजणे आवश्यक आहे कारण शेतकरी हा सर्वांचा पोशिंदा आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. रामकृष्ण गायकवाड यांनी आई ही कविता विद्यार्थ्यांना ऐकवली त्यामुळे विद्यार्थी पुन्हा एकदा आई कवितेच्या आठवणीत भावविभोर झाले. सर्व शिक्षकांनी याप्रसंगी आपले भावस्पर्शी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद सोनवणे यांनी केले तर सर्वांचे आभार सुधाकर बकले यांनी मानले. गणेश बिरारे, प्रभाकर जगताप, शफिक शेख, गणेश जाधव, प्रभाकर पालोदकर, गजानन पालोदकर, गजानन डमाळे, मुकेश पालोदकर, मसूद पठाण, उमाकांत कुलकर्णी, मंजीत शेळके, हरी काटकर, रामेश्वर पालोदकर, सुधाकर मिसाळ, सुरेश बोराडे, मल्हारी वरपे आदी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. जवळपास 70 विद्यार्थी व विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# जालनातील व्यापारी अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे- हस्तीमल बंब

**दैनिक युवक आधार**
**परतूर - जालना (अशोक ठोके)**



व्यापाऱ्यांच्या हिताच्या निर्याया बाबत येत्या एक जून रोजी जालना येथे संपन्न होणाऱ्या आधीवेशनाला मोठ्या संख्येने उपस्तितीत राहण्याचे आहवन व्यापारी महासंघाचे जिल्हाधक्ष हस्तीमल बंब यांनी केले. याबाबत परतूर येथे बाजार समिती दालनात पार पडलेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी हसिमल जी बम ( जिल्हाध्यक्ष जनरल मर्चंट असोसिएशन), सुभाष सोनवणे ( फिजिओथेरपिस्ट), मकरंद शहापूरकर (डिजिटल ऑर्बिट अप) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना बंब यांनी म्हटले कि जिल्ह्यात परतूर तालुक्यातील व्यापाऱ्यांचे संघटना चालवळीत मोठे योगदान असून प्रतोक वेळी येथील व्यापारी बांधव कार्यतात्परता दाखवत व्यापारी हितासाठी संघनतानंत्मक योगदान दर्शवतात. येथील व्यापारपेठ देखील चांगली असून व्यापाऱ्यांच्या हिताच्या निर्णयासाठी सदरील अधिवेश्नात महत्वाचे निर्णय ठरणार असून यावेळी सर्वांनी उपस्तितीत राहण्याचे आहवन त्यांनी यावेळी केले. दरम्यान परतूर व्यापाऱ्यांच्या वतीने निर्वाचित व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष राजेश मस्के यांनी परतूर कार्यक्षेत्रातून मोठ्या संख्येने व्यापारी बांधव या अधिवेषणाला सहभाग दर्शवणार असल्याचे अभिवचन दिले. यावेळी शहरातील व्यापारी महासंघ तालुका संघटक दिलीप होलानी, व्यापारी महासंघ अध्यक्ष सुरेश जी मंत्री,उपाध्यक्ष राजू मस्के , गोविंदजी मोर, अश्विन दायमा,पिंटूजी मूंदड़ा,राजू भाऊ कादे ,जनरल मर्चंड अध्यक्ष धीरज भंडारी,सरताज भाई ताम्बोली यांची उपस्थिती होती.

# आजच्या युवा पिढीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे आचार विचार आत्मसात करावे. प्रा. संजय मोरे.

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**भुसावळ ( जिल्हा जळगाव ),** अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांच्या 2586 जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी उत्कृष्टरित्या फुलांनी सजवलेल्या रथावर तथागत भगवान गौतम बुद्ध पूर्णकृती प्रतिमा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थाकृती पुतळा ठेऊन मुख्य मार्गावरून भव्य मिरवणुक काढण्यात आली होती. कार्यक्रमांच्या अध्यक्ष स्थानी सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी विश्वास बिऱ्हाडे हे होते तर विशेष प्रमुख अतिथी अँटी करप्शन मानव अधिकार सर्व



शक्ती सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रा. संजय मोरे हे होते. तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याला प्रा. संजय मोरे सौ. माया मोरे यांनी पुष्पहार मेणबत्ती लाऊन अभिवादन केले. त्या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना सांगितले कि,गौतम बुद्ध,सिद्धार्थ गौतम,सम्यक सम्मासंबुद्ध हि त्यांची अन्य नावे आहेत. शाक्यमुनी बुद्ध,गणराज्यचा राजा शुद्धोधन गौतम बुद्ध त्यांची पत्नी महाराणी महामाया ( मायादेवी यांच्या पोटी ) य ई. सं.पु. 563 मध्ये वैशाख पौर्णिमेला लुबिनी (नेपाळ) येथे जन्म झाला होता. सर्व सुखसोयीनी परिपूर्ण असलेल्या एका कुलीन कुटुंबात जन्मलेल्या बुध्दानी मानवी दुःखाच्या समस्यचे उत्तर शोधणेसाठी आपल्याजवळ असलेले सर्वस्व सोडण्याचा निर्णय घेतला. बुध्दाना बोधगया येथे बोधिवृक्षा खाली ध्यान केल्यानंतर त्यांना ज्ञान प्राप्ती झाली. . आणि ते सिद्धार्थ गौतम म्हणुन बुद्ध झाले. त्यांनी सतत 45 वर्ष भ्रमती केली. आणि लोकांना

धम्माचा उपदेश दिला. बुद्ध पौर्णिमा ( वैशाख पौर्णिमा )तथागत गौतम बुद्धाच्या जन्म महपरिनिर्वाण व ज्ञानप्राप्ती एकाच दिवशी प्राप्त झाल्या कारणाने या वैशाखी पौर्णिमेला खुपच महत्व असल्या कारणाने संपुर्ण विश्वामध्ये हा दिवस उत्सव म्हणुन साजरा केला जातो.बुद्ध हे ज्ञानी व तत्वज्ञानी होते.त्यांनी जगाला दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग दाखविला. गौतम बुध्दानी शांतीचा आणि मानवतावादी धम्माचा संदेश दिला. तरी आजच्या युवा पिढीने तथागत बुद्ध यांचे आचार विचार आत्मसात करून पुढील वाटचाल करावी असे प्रा. संजय मोरे यांनी सांगितले. कार्यक्रमा नंतर खिरदान वाटप करण्यात आले. त्यांचा स्वाद उपस्थित उपासक उपासिका यांनी घेतला.या कार्यक्रमाला सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी विश्वास बिऱ्हाडे सेवानिवृत्त मेल गार्ड डी. झेड. मोरे मायाताई मोरे उपप्रचार्य प्रमोद तायडे डॉ. महेंद्र सुरवाडे डॉ. सुरेखा इंगळे डॉ. संदीप गाढे चेतना गाढे प्रा. संगीता सोनवणे प्रा. स्नेहा सोनवणे शोभा कोळी जाधव मॅडम चंदन बिऱ्हाडे अँड अनिल सोनवणे सुरेंद्र रामटेके श्रीरंग सुरवाडे सयाबाई सुरवाडे शुभम जाधव रितेश तायडे विजय गायकवाड या सह असंख्य उपासक उपासिका उपस्थित होते प्रा. संजय मोरे.

# नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एक नंबरला राहील

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
**नांदेड - आ.प्रतापराव पाटील चिखलीकर**

मा.ना.अजीतदादा पवार यांच्या हस्ते चव्हाणवाडी येथे पक्ष प्रवेश सोहळा संपन्न




महाराष्ट्राचे धडाकेबाज,लोकप्रीय उपमुख्यमंत्री मा.ना.अजीतदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थीतीत .महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे माजी उपाध्यक्ष मा.शेषराव चव्हाण साहेबांच्या माध्यमातून चव्हाण वाडी येथे मुखेड तालूक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला. मा.ना.अजीतदादां पवार साहेबांनी पाकीस्तानला चोख ऊत्तर देवून धडा शिकविल्या बद्दल मा.पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार व्यक्त केले.देगलुर येथील शहिद जवान सचीन यादवराव वनजेला श्रद्धांजली अर्पण केली.राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या सर्वांचे स्वागत केले.मुखेड तालूक्यातील प्रश्न सोडविण्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमात बोलतांना मा.आ.तथा माजी खासदार मा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एक नंबरला राहील अशी घोषणा केली.माझ्यामागे मा.ना. अजीतदादा पवार साहेबांच्या रुपाने महाशक्ती ऊभी आहे आणि त्यांनी नांदेड जिल्ह्यासाठी मोठे योगदान देत आहेत.प्रलंबित कामांना मंजुरी देवून विकासाचे महाद्वार ऊघडत आहेत.मुखेड येथील गेल्या चाळीस वर्षापासून रखडलेला लेंडी प्रकल्पासही भरीव नीधी देवून तो प्रकल्प पूर्ण करण्याचा मार्ग मोकळा केला आहे.त्याचा लाभ देगलुर मुखेड तालूक्यातील तीस हजार शेतकऱ्यांना होईल. लेंडी प्रकल्पासाठी मा.मूख्यमंत्री फडणवीस साहेब,मा.शिंदेसाहेब यांचेही सहकार्य लाभले.म्हणुनच हा प्रकल्प पुर्ण होत आहे. बोधन बीलोली मुखेड जळकोट लातुर रोड हा रेल्वे मार्ग केंद्रीय रेल्वे मंत्री मा.अश्विनी वैष्णव यांनी जे अंतीम सर्वेक्षण झाले त्यानुसारच लवकरात लवकर होईल असे आश्वासन दिले आहे.

तसेच ऊदगीर देगलुर हा 356 कोटींचा मार्ग केंद्रीय मंत्री मा.नितीन गडकरी साहेबांच्या कृपेने मंजुर करण्यात मी यशस्वी झालो त्याचे टेंडरही निघाले आहे. कंधार मुखेड या डोंगराळ भागातील तरुणांना रोजगार मिळावा म्हणुन येथे मोठा ऊद्योग उभारण्याची मागणी मा.ना.अजीतदादा पवार यांच्याकडे केली. अशोक रावांचे मेव्हणे भास्करराव पाटील खतगांवकर यांनी राष्ट्रवादीत प्रशे घेतला,आज प्रवेश घेतलेले शेषराव चव्हाण हे सुद्धा माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईकांचे मेव्हणे आहेत,माझे मेव्हणे ही लवकरच राष्ट्रवादीत प्रवेश घेतील. कृषी ऊत्पन्न बाजार समीतीचे माजी सभापती सूशांत चव्हाण,अमोल चव्हाण,अशोकराव चव्हाणांचे पुतने ऊदय चव्हाण,किशनराव राठोडांचे नातु संतोष राठोड,माजी जि.प. सदस्य जे.टी.भंगारे,जिल्हा प्रवक्ते दिलीप कोडगिरे,हणमंतराव वाडीकर,सुरेश पाटील पाळेकर,निळु पाटील हदगांव,हैदर परदेशी,आण्णासाहेब जहीरे,रमेश आमनर व मुखेड तालूक्यातील ज्या प्रमुख कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला त्या सर्वांना सन्मानाची वागणुक मिळेल नव्या जून्या सर्व कार्यकर्त्यांची मोट बांधून आपल्या परीसराचा विकास घडवून आणन्याचे काम आपणास करावयाचे आहे असे सांगून येणाऱ्या स्थानीक स्वराज्य संस्था निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एक नंबर राहील असे काम आपल्या सहकार्याने करावयाचे आहे.प्रतापराव पूढे म्हणाले की, मी खासदारकीला पराभूत झालो म्हणुनच मला मा.ना.अजीतदादा पवार साहेबांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळाली.मी जिल्ह्यात काम करतांना कोणापुढे झूकलो नाही अन् झूकणार नाही. जेष्ठ नेते मा.भास्करराव पाटील,मा.आ.अविनाश घाटे,व्यंकटराव पाटील गोजेगांवकर,मा.मोहनराव हंबर्डे,मा.ओमप्रकाश पोकर्णा,मा. शेषराव चव्हाण व आपल्या सर्वांच्या बळावर मी तडफेने काम करुन मा.अजीतदादांचे हात बळकट करीन.भवीष्यात दादांना महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळेल असे काम आंम्ही ऊभे करु.जिल्ह्यात आतापर्यंत 131000 सदस्य नोंदणीचा टप्पा पार केला असून पाच लाख सदस्य नोंदणीचा संकल्प पुर्ण करावयाचा आहे. मा.ना.इंद्रनिल नाईक,मा.भास्करराव पाटील खतगांवकर,मा.आ.अविनाश घाटे,मा.व्यंकटराव पाटील गोजेगांवकर, यांनी ही सभेस संबोधीत केले.प्रास्ताविक मा.शेषराव चव्हाण यांनी केले. व्यासपीठावर आ.विक्रम काळे,आ.संजय बन्सोडे, यूवक अध्यक्ष सूरजदादा चव्हाण,जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी,वसंत सूगावे,रामदास पाटील सूमठाणकर,प्रविण पाटील चिखलीकर,जीवनराव घोगरे,मुक्तेश्वर धोंडगे,,मीनलताई खतगांवकर,चित्राताई लूंगारे,तालूकाध्यक्ष बाबुराव कदम बिल्लाळीकर,बाळासाहेब पाटील रावनगांवकर आदी प्रमुख नेते ऊपस्थीत होते. सभेचे आयोजन मा.सभापती स्वप्नील चव्हाण,मा..जि.प.अध्यक्षा वैशाली चव्हाण,तेजस चव्हाण व परीवार यांनी केले.

# मान्सूनपूर्व तयारीसाठी महसूल प्रशासन सज्ज

## दि.१४ मे रोजी आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचुर :** आगामी पावसाळ्यात उद्‌भवू शकणाऱ्या नैसर्गिक आपत्तींच्या प्रतिबंधक उपाययोजना, प्रतिसाद आणि पुनर्वसन यासाठी निफाड तालुका प्रशासन सज्ज होत आहे. या अनुषंगाने तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समितीची मान्सूनपूर्व तयारी संदर्भातील बैठक बुधवार दि.१४ मे २०२५ रोजी दुपारी ३ वाजता तहसिल कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात होणार आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी निफाडचे उपविभागीय अधिकारी मा. डॉ. शशिकांत मंगरुळे हे असणार आहेत अशी माहिती निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी दिली. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५, ३१, ३३, ३४ व ३५ अन्वये ही बैठक आयोजित करण्यात येत असून, संभाव्य आपत्तींचा धोका कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे, आपत्ती निवारणात समन्वय साधणे व आपत्ती पश्चात पुनर्वसनाचे नियोजन करणे या बाबींचा आढावा यामध्ये घेतला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सर्व शासकीय विभागांनी त्यांच्या स्तरावर केलेल्या मान्सूनपूर्व तयारीचे सादरीकरण बैठकीत करणे आवश्यक आहे. तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी स्पष्ट निर्देश दिले असून, प्रत्येक विभागप्रमुखाने स्वतः या बैठकीला वेळेवर उपस्थित राहावे, प्रतिनिधी न पाठविण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. आपत्ती काळात नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधा, उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामग्री, संपर्क यंत्रणा तसेच तत्काळ प्रतिसाद योजना यांची अद्ययावत माहिती सादर करणे अनिवार्य आहे, असेही तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी नमूद केले. निफाड तालुका दरवर्षी पुर, अतिवृष्टी, वीज पडणे, वादळ यांसारख्या संकटांचा सामना करत आला आहे. यंदा मान्सून वेळेत दाखल होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाची सज्जता आणि विभागांमधील समन्वय अत्यावश्यक ठरणार आहे. ही बैठक तालुकास्तरावरील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या कार्यक्षमतेचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी संयुक्त धोरण आखण्याची संधी प्रदान करणार आहे.





**दैनिक युवक आधार** - प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांच्या कार्याची माहिती शालेय विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात त्यांच्या प्रतिमेसह त्यांच्या जीवन प्रवासातील महत्त्वपूर्ण घटना आणि कार्याची माहिती विद्यालयाच्या भिंतींवर शिल्पमध्ये आकर्षकपणे रेखाटण्यात आली आहे. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सोमवारी या उपक्रमाची पाहणी करून आढावा घेतला तसेच आवश्यक त्या सूचना केल्या. यावेळी त्यांच्यासोबत दि.बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, डॉ.सुरेखा मोहोकर प्रभाग १९ चे अध्यक्ष पवन सोनी, महापालिकेचे अधिकारी संजय कटेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन तर्फे जागतिक परिचारिका दिनानिमित्त परिचारिकांचा सन्मान...

## परिचारिकांनो...! तुमच्या सेवाभावाला सलाम....

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेलमधील नेहमीच महिलांसाठी कार्यरत असणारी एकमेव संस्था ती म्हणजे क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन होय. महिलांना न्याय आणि सन्मान मिळवून देणारी ही संस्था असून संस्थापक/अध्यक्षा सौ.रुपालीताई शिंदे यांनी आज दि.१२ मे २०२५ रोजी जागतिक परिचारिका दिनानिमित्त क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन तर्फे परिचारिकांचा छोटेखानी कार्यक्रम घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. प्रत्येक रुग्णाशी कसलाही दुजाभाव न करता शुश्रूषा करत आहेत. सध्या रुग्णांच्या सगळ्यात जवळची नातेवाईक ही परिचारिकाच असून,त्या 'सिस्टर' या नात्याने पूर्ण सेवा देत आहेत. ह्या नारी शक्तींना त्यांच्या सन्मानप्रीत्यर्थ त्यांना केक कापून व सन्मानचिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रम निकम परमार हॉस्पिटल

याठिकाणी डॉक्टर माळी यांच्या सहकार्याने परिचारिका सौ अश्विनी पाटील, सौ दुर्गा पाटील, कुमारी स्नेहा, सौ सीमा, ममता मावशी

आदी परिचारिकांना फॉउंडेशनच्या अध्यक्षा मा. सौ रुपालीताई शिंदे यांच्या हस्ते जागतिक परिचारिका दिनाचे सन्मानचिन्ह देऊन त्यांचा या खास दिनी सन्मान करण्यात आला. क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन च्या कारंजाडे अध्यक्षा.सौ. स्नेहा धुमाळ आणि मा.सौ. अश्विनी पाटील यांनी अथक मेहनत घेतली. यावेळी सर्व परिचारिका व इतर स्टाफ भारावून गेले होते. त्यांनी सौ. रुपाली शिंदे व त्यांच्या सदस्या यांचे मनभरून कौतुक केले व आभार व्यक्त केले. हा कार्यक्रम चांगल्या पद्धतीने संम्पन्न करण्यात आला.









## स्व.वसंतराव चव्हाण यांच्या वचनाची खा.रवींद्र चव्हाण यांच्या कडून पूर्तता

### संरक्षण भिंत बांधकाम पायाभरण शुभारंभ सोहळा संपन्न..खा.रविंद्र वसंतराव चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड वार्ताहर**

नांदेड*:दि.१३.जिल्यातील नायगाव शहरातील वैशाखी बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने स्व. वसंतराव पाटील चव्हाण साहेब यांनी वचनास कटिबद्ध राहून चव्हाण परिवाराने लिंबूनि कुशीनारा बुद्ध विहार नायगाव बा.या सार्वजनिक बुद्ध विहाराच्या संरक्षण भिंत बांधकाम पायाभरणी शुभारंभ खासदार रविंद्र वसंतरावचव्हाण साहेबांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी श्रीनिवास पाटील चव्हाण (तालुका अध्यक्ष खरेदी विक्री संघ नायगाव),विजय पाटील चव्हाण (उपनगराध्यक्ष नायगाव), संजय पाटील चव्हाण (नगराध्यक्ष प्रतिनिधी नायगाव) उपविभागीय पोलीस अधीक्षक पोपळघट साहेब, ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत सोनखेडकर,पोलीस निरीक्षक मार्कड साहेब,गंगाधर सोनकांबळे(नगरसेवक), लक्ष्मण भवरे (पत्रकार), पांडुरंग चव्हाण (माजी नगरसेवक), विठ्ठल बेळगे (नगरसेवक), पंढरी भद्रे (माजी सैनिक) शिवराज गायकवाड,माणिक चव्हाण (तालुका अध्यक्ष),नारायण मदेवाड (नगरसेवक),प्रकाश हनुमंते (पत्रकार) रघुनाथ सोनकांबळे (सामाजिक कार्यकर्ते),रामेश्वर भालेराव,श्रीधर सूर्यवंशी,बंटी सूर्यवंशी यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

## उपचार वेळेवर न मिळाल्याने आई सह बाळाचा मृत्यू मंडणगड मधील घटणा

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण प्रतिनिधी**
**योगेश सुतार**



मंडणगड तालुक्यातील कुडुक बुद्रुक येथील गर्भवती महिलेला उपचारासाठी घेऊन जात असताना प्रवासादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घटना दि १० मे रोजी घडली. या घटनेनंतर तालुक्यातील आरोग्य विभाग व्यवसस्थापणाच्या कार्यपद्धती वर प्रश्नचिन्ह उपस्थिती केले जात आहेत. या संदर्भात महिलेच्या नातेवाईकांनकडुन मिळालेल्या माहितीनुसार मौजे मंडणगड तालुक्यातील कुडुक बुद्रुक या गावातील विधी संदेश सावणेकर ( वय वर्ष 32 ) या सात ते आठ महिन्याच्या गरोदर होत्या त्यांना अचानक त्रास होऊ लागल्याने कुटुंबातील नातेवाइकांनी त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र देव्हारे येथे उपचारासाठी आणले परंतु वैद्यकीय अधिकारी यांनी पुढील उपचारासाठी रुग्णवाहिकेमधुन ग्रामीण रुग्णालय मंडणगड येथे पाठविण्यात आले परंतु या रुग्णालयात महिलेची प्रकृती अस्वास्थ्यामुळे व खालावल्याने तीला दापोली येथील उपजिल्हा रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले परंतु रुग्णालयात रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही तर 108 ही रुग्णवाहिका कॉलसाठी दुसरीकडे गेली होती. तर 102 रुग्णवाहिका विविध कारणांमुळे उपलब्ध होऊ शकली नाही. यामुळे खाजगी रुग्णवाहिका घेऊन दापोली येथे घेऊन जाण्याचा निर्णय घेण्यात आला परंतु प्रवासादरम्यान महिलेसह बाळाचा ही मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

तालुक्यातील या घटनेनंतर तालुक्यात सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध असुनही तालुक्यातील आरोग्य व्यवस्थापन यंत्रणेकडून रुग्णवाहिका का उपलब्ध झाली नाही असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. आत्यावशयक सुविधेसाठी रुग्णवाहिका आवश्यक असताना ही रुग्णवाहिका का उपलब्ध झाली नाही. असा प्रश्न सर्व सामान्य माणसाला पडला आहे.

## रत्नागिरी येथे आयोजित कृषी तंत्रज्ञान विकास साप्ताह व कृषी विकास परिषदेसाठी राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री आणि रत्नागिरी जिल्याचे पालकमंत्री उदय सामंत याची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण प्रतिनिधी**
**योगेश सुतार**




रत्नागिरी येथे आयोजित कृषी तंत्रज्ञान विस्तार साप्ताह व कृषी विकास परिषदेसाठी राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री व रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत उपस्थित होते. रत्नागिरी जिल्ह्यामधे अशा प्रकारचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनात आतापर्यंत ११ हजार शेतकर्यांनी भेट दिली आहे. ही संख्या अजून वाढे असे मत यावेळी पालकमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले. शेतकर्यांच हित डोळ्यासमोर ठेवून भविष्यात अशा प्रदर्शनाची संख्या वाढवली जाईल अस मत यावेळी मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केल. माझ्या मतदारसंघातील शेतकर्यांना याचा नक्की फायदा होईल. या प्रदर्शनाच उत्कृष्ट नियोजन केल्यामुळे उदय सामंत यांनी आयोजकाचेही कौतुक केले. शेतकर् यासाठी उपयुक्त असणार्या विविध तंत्रज्ञानाचा परिचय कृषी तंत्रज्ञान विस्तार साप्ताह च्या माध्यमातून शेतकर्यांना झाला आहे. शेती मधील नवनवीन प्रयोग त्याचा शेतकर्यांना उत्पादन वाढीसाठी कसा फायदा होईल हे देखील या साप्ताह च्या माध्यमातून शेतकर्यांन पर्यंत पोहचवण्यात आले आहे. शेतकर्यांच्या हितासाठी महायुती सरकार अशा कार्यक्रम ना कायम मदत करेल. आणि भविष्यात सर्वोतोपरी मदत केली जाईल असे हि उदय सामंत यांनी सांगितले. यावेळी मंत्री मंडळातील सहकारी मंत्री भरत शेठ गोगावले व राज्य मंत्री योगेश कदम अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## दहावीच्या परीक्षेत सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाचे घवघवीत यश संपादन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. विद्यालयाचा एकूण निकाल ९७.८७ लागला असून विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून प्रथम श्वेता विलास दामोदर ९५.००, द्वितीय संजना गणेश लोखंडे ९३.००, तृतीय भाग्यश्री सोमीनाथ मोरे ९२.४०, चतुर्थ अनुष्का एकनाथ लोखंडे ९२.००, तर अनुक्रमे राजकन्या संभाजी मोरे ९१.४०, अनुष्का रामेश्वर पालोदकर ९१.२०, साक्षी शामराव सूळ ९१.०० मिळविले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पालोदकर, सचिव डॉ राहुल पालोदकर, प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## सीमा टकले - काळे यांनी आष्टी प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा स्वीकारला पदभार



**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**

आष्टीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी आष्टी ला गटशिक्षणाधिकारी हे पद मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु पुन्हा प्रभारी गटशिक्षणाधिकारी हे पद प्रभारी गटशिक्षणाधिकारी सिमा टकले - काळे यांच्या कडे आले असून नुकताच त्यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला आहे.त्यांच्या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातील विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. गेल्या सात वर्षापासून आष्टीच्या नशिबी प्रभारी गटशिक्षणाधिकारी हे पद असून प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव दिनांक ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले त्यांचे रिक्त जागी गटशिक्षणाधिकारी पद अधिकारी येतील अशी अपेक्षा होती परंतु पुन्हा एकदा आष्टीचे गट शिक्षण अधिकारी हे पद प्रभारी राहिले आहे शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती सीमा टकले काळे प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार स्वीकारला असून त्यांचे स्वागत करुन शुभेच्छा दिल्या यावेळी त्रिंबक दिंडे सर , राजेंद्र लाड , सतिश मासाळकर, मुख्याध्यापक सोनवणे, चव्हाण, भडके, महेश तावरे, निंबाळकर,बापू शिंदे, बागवान, पाचारणे, वळवले, मनोज यादव , काळे बाळासाहेब,आदी उपस्थित होते.

## गरिमा भूषण थुलकर अड्याळ विद्यालय अड्याळ येथून प्राविण्य सूचित

### पत्रकार संजीव भांबोरे यांनी प्रत्यक्षात घरी भेट देऊन तिचे केले अभिनंदन

**दैनिक युवक आधार**



**भंडारा वार्ताहर**- पवनी तालुक्यातील अड्याळ येथील अड्याळ विद्यालय अड्याळ विद्यालयाची विद्यार्थिनी घरची परिस्थिती सर्वसाधारण असताना कुमारी गरिमा भूषण थुलकर या विद्यार्थिनीने अड्याळ विद्यालयातून मुलींमधून 92.60% गुण घेऊन शाळेतून मुलींमधून प्रथम व शाळेतून दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली .आज दिनांक 13 मे 2025 ला सायंकाळी 5 वाजता मुलीचे अभिनंदन करण्याकरता प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व दैनिक माझा विदर्भ विभागीय संपादक संजीव भांबोरे यांनी घरी प्रत्यक्ष घरी भेट देऊन अभिनंदन केले. व पुढील उज्वल भविष्याकरता तिला शुभेच्छा दिल्या. याबाबत विद्यार्थिनी कुमारी गरिमा यांच्यासोबत चर्चा केली असता मी सतत 8 तास अभ्यास करीत असल्याचे तिने यावेळी सदर प्रतिनिधी बोलताना सांगितले. पहाटेला चार वाजे उठल्यानंतर सकाळी नऊ वाजेपर्यंत अभ्यासाकडे सतत लक्ष देत असल्याने मला हे यश मिळाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मला अकरावी सायन्स घेण्याची इच्छा असून समोर काय बनण्याची इच्छा आहे यावर प्रश्न उपस्थित केला असता बारावीनंतर अशाच प्रकारचे यश संपादन करून सॉफ्टवेअर इंजिनियर बनण्याची इच्छा असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी त्यांचे मोठे वडील अमोल थुलकर, मोठी आई समीना थुलकर, भाऊ अंकित थुलकर यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

## एकबुर्जी येथील भिंत कोसळून युवकाचा जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



राळेगाव - तालुक्यातील एकबुर्जी येथे दि.१२/०५/२०५ ला घडलेल्या दुर्दैवी घटनेत दिवांशू गजानन रोकडे (वय अंदाजे१५) यांचा भिंत कोसळून मृत्यू झाला. घटना सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. आपल्या राहत्या घराजवळील एका जुन्या इमारतीजवळ होते, त्याच दरम्यान अचानक भिंत कोसळली आणि ती त्यांच्या अंगावर पडली. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीस धाव घेतली व त्यांना जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी भेट देत अधिक तपास सुरू केला आहे. जुनी व जीर्ण झालेली बांधकामं किती धोकादायक ठरू शकतात, याचे हे ताजे उदाहरण आहे. दिवांशू रोकडे हे एक कर्तबगार बालक होते. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# जल जीवन योजनेचे पाणी मुरते कुठे ?

## घोषणा हर घर नळ,अन.. अनेक गावात पाण्यासाठी तारांबळ

## केवळ नियोजनाअभावी महत्तवाकांक्षी योजनेचा फज्जा

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी**
**रणजितसिंह ठाकूर**

**वाशिम** : केंद्र सरकारने २०१९ मध्ये मोठा गाजावाजा करत जल जीवन मिशन ही योजना आणली. सदर योजने अंतर्गत मार्च २०२३ पर्यंत देशातल्या सर्व ग्रामीण भागात प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोहचविण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून प्रत्येक गावांसाठी अमाप निधीची खिरापत सुद्धा वाटण्यात आली. कारण या योजनेची टॅगलाईनच अशी आहे,' हर घर नल, हर घर जल ' मात्र केवळ नियोजनाअभावी या महत्त्वाकांक्षी योजनेचा फज्जा उडाला असल्याची बाब समोर येत आहे. योजनेचे काम नीट झालं नाही असे आरोप सबंधित गावातील नागरीक करीत आहेत. त्या अनुषंगाने सिटीन्यूज सुपरफास्टने सरकार व प्रशासनाच्या निदर्शनात आणून देण्यासाठी ' हर घर जल ' या दाव्याची ग्राउंडवर काय परिस्थिती आहे याचा आढावा



घेतला असता " हर घर नळ, अन् पाण्यासाठी नागरिकांची तारांबळ " हे भीषण वास्तव पहावयास मिळत आहे. सदर गंभीर बाब लोकप्रतिनिधी व शासनाच्या निदर्शनात आणून देण्यासाठी सिटीन्यूज क्रमशः प्रयत्न करणार आहे. संपूर्ण जिल्ह्यात अशी अनेक गावं आहेत, जिथे जिथे पाण्याच्या टाक्या बांधल्या, पाईप लाईन टाकल्या गेली. मात्र नळ जोडणी अद्यापही अपूर्णच आहे. तर काही गावात नळ जोडणी झाली असली तरी त्या नळातून एकदाही पाणी आलं नाही असे सबंधित गावातील ग्रामस्थ सांगत आहेत. या बाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, काही ठिकाणी या योजनेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे आरोप होत आहेत तर काही ठिकाणी नियोजनाच्या अभावामुळे निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे बोलले जात आहे. काही गावातील जल जीवन मिशनच्या विहिरींना भरपूर पाणी असूनही काम ५० टक्क्यावरच खोळंबल्यामुळे पाणी टंचाई गंभीर बनली असल्याचे वास्तव समोर आले आहे. परिणामी टंचाईग्रस्त गावातील अबाल वृद्धांना पिण्याच्या पाण्यासाठी काही किलोमीटर अंतरावरुन पायपीट करावी लागत असल्याची माहिती सबंधित गावकऱ्यांनी दिली आहे. हा प्रश्न केवळ काही तालुक्याचाच नाही तर संपूर्ण जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती असल्याची माहिती हाती येत आहे. ही गंभीर बाब सरकार, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या लक्षात आणून देण्यासाठी सिटीन्यूज सुपरफास्ट दररोजच्या अंकात क्रमशः वृत्तमालिका प्रकाशित करून सामाजिक समस्येला वाचा फोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे.

**महत्त्वाकांक्षी योजनेचे पाणी मुरते तरी कुठे ?**

ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी केंद्र सरकारने २०१९ मध्ये ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. पाणी हा प्रत्येक राज्याचा विषय असल्याने ग्रामीण भागातील सर्व घरांना नळाद्वारे पाण्याची योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी केंद्राने राज्य सरकारवर टाकली आहे. मात्र यात तांत्रिक आणि वित्तीय साह्य केंद्र सरकारचेच आहे. परंतु प्रत्येक जिल्ह्यात संनियंत्रण करणाऱ्या यंत्रणेकडून प्रभावी आखणी आणि अंमलबजावणी होत नसल्याने २०२३ पर्यंत पूर्ण होणारी सदर योजना २०२५ उजाडूनही अद्याप पर्यंत पूर्ण झाली नाही. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी योजनेचे पाणी मुरते तरी कुठे ? हा गहन प्रश्न उपस्थित होत आहे.

## मुलींनी मारली बाजी : सिल्लोड तालुक्याचा दहावी निकाल 96.89 टक्के, 23 शाळांचा निकाल १०० टक्के

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



दहावीच्या परीक्षेचा निकाल ऑनलाईन जाहीर झाल्यानंतर लॉजिक कॉम्प्युटर्स, सिल्लोड येथे विद्यार्थ्यांसाठी निकाल पाहण्यासाठी मोफत संगणक लॅब उपलब्ध करून देण्यात आली. या सुविधेचा लाभ घेत अनेक विद्यार्थ्यांनी आपला निकाल स्वतः संगणकावर पाहण्याचा आनंद अनुभवला.

**सिल्लोड** – इयत्ता दहावी परीक्षेमध्ये सिल्लोड तालुक्याचा निकाल 96.89 टक्के लागला असून यामध्ये मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचा निकाल 98.05 टक्के तर मुलांचा निकाल 95.91 टक्के इतका आहे. 23 शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. इयत्ता दहावी परीक्षा संपल्यानंतर निकालाची परीक्षा सर्वांच्या लक्षात होती मंगळवार १३ मे रोजी महाराष्ट्र स्टेट बोर्डाचा वेबसाईटवरुन निकाल जाहीर झाला. इयत्ता दहावी साठी तालुक्यातून 3671 मुले तर 3082 मुली अशा एकूण 6753 विद्यार्थी परीक्षेस बसले होते. यामध्ये 3521 मुले व 3022 मुली उत्तीर्ण झाल्या. एकूण 6543 विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी झाले. १. जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय, पानवडोद ,२. मुरडेश्वर हायस्कूल, लिहाखेड़ी,३. दयानंद माध्यमिक विद्यालय, घाटांब्री,४. गजानन विद्यालय, आसडी ५. वसंतदादा पाटील विद्यालय, हळदा, ,६.सावित्रीबाई फुले हायस्कूल, केऱ्हाळा, ,७. नॅशनल मराठी हायस्कूल, डोंगरगाव,८. संत एकनाथ माध्यमिक विद्यालय, सिल्लोड,९. जोगेश्वरी माध्यमिक विद्यालय, घाटनांद्रा, १०. ज्ञानदीप माध्यमिक विद्यालय, शिक्षक नगर, सिल्लोड,११. महाराणा प्रताप माध्यमिक विद्यालय, गव्हाली ,१२. श्री शिवछत्रपती माध्यमिक विद्यालय, टाकळी जीवरग ,१३. श्री अंबिका माता माध्यमिक विद्यालय, वडोद (चाथा),१४. सिंधू मेमोरियल माध्यमिक विद्यालय, सिल्लोड,१५. नॅशनल इंग्लिश हायस्कूल, अजिंठा, ता. सिल्लोड,१६. स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, छ. संभाजीनगर,१७. ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल, सिल्लोड,१८. माणिकराव पालोदकर इंग्लिश हायस्कूल, सिल्लोड ,१९. जमालशा बाबा उर्दू हायस्कूल,२०. होली फेथ इंग्लिश स्कूल, भराडी ,२१. स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल,२२. व्यंकटेश हायस्कूल, निल्लोड फाटा ,२३. आदर्श सेकंडरी अँड हायर सेकंडरी स्कूल, कायगाव

23 विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

# होंडा ॲक्टीव्हा स्कुटीची चोरी

दैनिक युवक आधार
पनवेल, वार्ताहर

पनवेल रेल्वे स्टेशन बाहेरील रिक्षा स्टॅण्डच्या जवळ उभी करून ठेवलेली होंडा ॲक्टीव्हा स्कुटी गाडीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे.केतन गोसावी यांची 10 हजार रुपये किंमतीची होंडा ॲक्टीव्हा स्कुटी गाडी क्रं.एमएच-06-एटी-4152 काळ्या रंगाची ही सदर ठिकाणी उभी केली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याने मारहाण करून ब्लेडने केले चेहऱ्यावर वार

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

दारु पिण्यासाठी आरोपीने पैसे मागितले असता ते न दिल्याने आपसात संगनमत करून सदर रिक्षा चालकास मारहाण करून तसेच ब्लेडने चेहऱ्यावर वार करून त्याला जखमी केल्याची घटना रेल्वे स्टेशनच्या आवारात साई मंदिराजवळ घडली आहे.
रिक्षा चालक आशिक आलम शेख (35 रा.नवनाथ झोपडपट्टी) याच्याकडे चार अनोळखी इसमांनी दारु पिण्यासाठी पैसे मागितले असता त्याने त्यास नकार दिल्याने या चौघांनी संगनमत करून त्याला हाता चापट्याने मारहाण करून त्यानंतर ब्लेडने त्याच्या चेहऱ्यावर वार करून त्याला जखमी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## डेब्रीज टाकण्यासाठी आलेले 4 डंपर जप्त; चालकांवर कारवाई

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

'सिडको'ने संपादित केलेल्या जमिनीवर आणि भूखंडावर मानवी आरोग्यास धोकादायक तसेच पर्यावरणास हानिकारक असलेले डेब्रीज टाकणाऱ्या डंपर चालकांची 'सिडको' कडून धरपकड सुरुच आहे. उलवे परिसरातील 'सिडको' च्या मोकळ्या भूखंडावर डेब्रीज टाकण्यासाठी आलेले 4 डंपर 'सिडको' च्या पथकाने उलवे येथील अटल सेतू जवळ पकडले. त्यानंतर सदर 4 डंपर चालकाविरोधात उलवे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करुन सर्व डंपर जप्त केले आहेत. 'सिडको'च्या भूखंडावर अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात डेब्रीज टाकण्यात येत असून सदरचे डेब्रीज मानवी आरोग्यास धोकादायक आणि पर्यावरणास हानीकारक असल्याचे आढळून आले आहे.
त्यामुळे 'सिडको'च्या भूखंडावर अनधिकृतपणे डेब्रीज टाकणाऱ्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली 'सिडको'चे दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रीकी विभाग आणि पोलीस पथकाकडून जोरदार कारवाई सुरु करण्यात आली आहे. मुंबई येथून अटल सेतू मार्गे मानवी आरोग्यास हानिकारक असलेले डेब्रीज टाकण्यासाठी 4 डंपर उलवे भागात आले होते. याबाबतची माहिती सिडकोच्या पथकाला मिळाल्यानंतर पथकाने उलवे येथील अटल सेतू जवळ धाव घेऊन डेब्रीजने भरलेले 4 डंपर ताब्यात घेतले. या कारवाईत पकडण्यात आलेल्या सुभाषचंद्र यादव (26), सुरजकुमार पाल (27), आझाद सिंग (28) आणि 35 वयोगटातील चालक या चारही डंपर चालकाविरोधात उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## नवी मुंबई पोलीस एक पाऊल पुढे

### पोलिसांची माहिती आता 'चॅटबोट'द्वारे एका क्लिकवर

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

नवी मुंबई पोलीस दलाने नागरिकांशी समाज माध्यमाद्वारे संवाद साधण्याच्या प्रक्रियेत आणखी एक नवे पाऊल टाकले आहे. पोलिसांनी नागरिकांना घरबसल्या पोलीस दलाविषयी तसेच पोलिसांच्या कार्य पध्दतीविषयी कुठल्याही प्रकारची माहिती मिळवता यावी, यासाठी चॅटबोट सेवा सुरु केली आहे. त्यामुळे नागरिकांना नेहमी भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे 'चॅटबोट' द्वारे एका क्लिकवर मिळणार आहेत. चॅटबोट सेवा सुरु करणारे नवी मुंबई राज्यातील पहिले पोलीस आयुक्तालय ठरले आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नागरिकांना सेवा-सुविधा देण्यामध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यासाठी नवी मुंबई पोलीस दल कायम अग्रेसर राहिले आहे. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या जमान्यात नवी मुंबई पोलीस दलाने चॅटबोट सेवा सुरु करुन नागरिकांशी समाज माध्यमाद्वारे संवाद साधण्याच्या प्रक्रियेत आणखी एक नवे पाऊल टाकले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या प्रयत्नाने सुरु करण्यात आलेल्या या 'चॅटबोट'चे उद्‌घाटन नुकतेच राज्याचे गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम यांच्या हस्ते झाले.
नवी मुंबई पोलिसांच्या अधिकृत वेबसाईटद्वारे नागरिकांना 'चॅटबोट'ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नागरिकांना पोलीस दलाशी संबंधित माहिती, कार्यपध्दती, तक्रार प्रक्रियेची माहिती तसेच विविध पोलिस सेवा याबाबत त्वरित मार्गदर्शन मिळणार आहे. सदर सेवा 24/7 उपलब्ध असून, नागरिकांना त्यांच्या स्मार्टफोन, संगणक किंवा टॅबलेटवरुन या 'चॅटबोट'द्वारे नवी मुंबई पोलिसांशी संवाद साधता येणार आहे. सदर उपक्रमामुळे नागरिकांना पोलीस स्टेशनमध्ये प्रत्यक्ष जाण्याची गरज न पडता अनेक शंका आणि चौकशी 'चॅटबोट'द्वारे करता येणार आहे. विशेष म्हणजे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेतून नागरिकांना संवाद साधता येणार आहे.
एआय चॅटबोट'चा वापर करण्यासाठी नवी मुंबई पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर (पर्रीळाीलरळिेश्रळलश.सीं.ळप) उजव्या बाजुला खालील बाजुस नवी मुंबई पोलीस हेल्पवर क्लिक केल्यानंतर चॅटबॉट पेजवर जाता येणार आहे. या 'चॅटबोट'मध्ये नागरिकांना पोलीस सेवांशी संबंधित प्रश्न विचारुन माहिती घेता येणार आहे. तसेच वरच्या बाजुला असलेल्या चॅट नाऊ वर क्लिक करुन चॅट शॉट सोबत संवाद देखील साधता येणार आहे.

**'चॅटबोट' द्वारे मिळणाऱ्या सुविधा...**

गुन्हे टाळण्यासाठी सुरक्षा टिप्स आणि सायबर सुरक्षा, फिशिंग, ऑनलाईन फसवणूक, चोरी, इत्यादी गुन्ह्यांवर प्रतिबंधक उपाय सांगितले जाणार आहे. तसेच नवीन गुन्हेगारी पध्दतींबद्दल नागरिकांना सतर्क केले जाणार आहे. पोलीस स्टेशनचे तपशील, केसची प्रगती, दस्तऐवज आवश्यकता, आदि माहिती सहज शोधता येणार आहे. ऑनलाईन एफआयआर, पासपोर्ट व्हेरिफिकेशन आणि इतर सेवांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. नागरिकांना योग्य अधिकाऱ्यांशी किंवा विभागाशी जोडले जाणार आहे. पोलीस आणि नागरिक यांच्यात पारदर्शक संवाद वाढविण्यासाठी चॅटबॉट वापरला जाणार असून नागरिक त्यांच्या सूचना, तक्रारी किंवा प्रश्न थेट पोलिसांशी सामायिक करु शकणार आहेत.

## टँकर मधील डिझेलची चोरी

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

कर्नाटकातून तळोजा परिसरात माल खाली करण्याकरितां आलेल्या टँकरमधून डिझेलची चोरी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. विजयकुमार अजोरपाल हे ठाणे जिल्ह्यात राहत आहेत. हे कळंबोली येथील टैंकर क्रमांक एमएच 43 सी.ई 1688 या गाडीवर टैंकर चालक आहेत. विजयकुमार यांनी बी. पी. कोगनोली, नॅशनल हायवे आप्पाचीवाडी क्रॉस कोगनोली या पंपावर 218 लीटर डिझेल भरले होते. मँगलोर कर्नाटक राज्यातून तळोजा एम.आय.डी.सी. येथे माल खाली करण्यासाठी आले होते. यावेळी तळोजा एम.आय.डी.सी. येथी एशियन पेंट कंपनीच्या जवळ रात्र झाल्यामुळे ते गाडीतच झोपले. सकाळी उठल्यानंतर डिझेलचा वास येऊ लागल्यामुळे पाहणी केली असता डिझेलची चोरी झाल्याचे लक्षात आले. याबाबतची माहिती त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात दिली आहे.

# गुप्त भेटीमागे दडलय काय ?

## आयुक्तांच्या सुट्टीतील करंजा भेटी मागे मच्छीमारांचा थेट सवाल!

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

शासकीय सुट्टीच्या दिवशी, मत्स्यव्यवसाय आयुक्तांचा करंजा बंदरावर गुप्त दौरा म्हणजे निव्वळ योगायोग की योजनाबद्ध "साटेलोट"? या एकाच भेटीने मच्छीमार समाजात खळबळ माजली आहे. करंजा बंदर म्हणजे आधीपासूनच भ्रष्टाचार, निकृष्ट कामे, आणि अवैध मासेमारीच्या आरोपांमुळे वादाच्या भोवऱ्यात आहे. याच ठिकाणी आयुक्तांनी कोणालाही न सांगता, थेट 'सुट्टीत' हजेरी लावल्याने संशयाचे ढग गडद झाले आहेत. विशेष म्हणजे, या बंदराच्या मालकीहक्कावरच प्रश्नचिन्ह असताना आयुक्तांनी तिथे आपली शासकीय सुट्टी असताना भेट देणे का पसंत केले? हा प्रश्न येथीलस्थानिक मच्छीमारांनी उपस्थित केला आहे. या दौऱ्या दरम्यान आयुक्तांच्या डोळ्या समोरच पर्ससीन बोटींनी खुलेआम मासळी विक्री केली, अवैध बांधकामे ताठ मानेने उभी राहिली; पण कारवाईचा शून्य ! हाच मूकदर्शकपणा मच्छीमार समाजाच्या रोषाचा केंद्रबिंदू ठरत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही बंदरात ड्रेजिंगचे काम अजून अधांतरी, त्यात बोटींना होणारे नुकसान, अरुंद रस्त्यांची



कोंडी, आणि कोणतीही उपाययोजना नाही–हे चित्र शासनाच्या अपयशाचा स्पष्ट दाखला देतेअतना सर्वसामान्य मच्छीमारांशी संवाद न साधता मत्स्यव्यवसाय आयुक्तांचा करंजा बंदरावरचा चुपकेचुपके दौराआणि त्यात सुट्टीचा दिवस, असताना! अनेक मच्छीमार बांधवानाहा अशर्याचाधक्का होता कारण लवकरच पावसाळी हंगामात शसकीय नियमानुसार मासेमारी बंदी लागू होणार असताना हा दौरा वेगळ्याच हेतूने झाला असावा, असा ठाम आरोप येथील काही प्रमुख मच्छीमार नेत्यांनी केला आहे. पावसाळी बंदीतही मागील वर्षी मासेमारी सुरू ठेवणाऱ्या बोटींमध्ये एक खलाशी बेपत्ता झाला होता, त्यावर आजतागायत चौकशी झालीच नाही त्यात स्थानिक परवाना अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई म्हणजे प्रमुख यंत्रणेच्या सोटेलोटे पद्धतीची कहाणीच! म्हणून आता समस्त मच्छीमार बांधवांची मागणी एकच मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी या गुप्त दौऱ्याची चौकशी करावी आणि या गुप्त भेटीमागे दडलय काय याचा कसून शोध घ्यावा जर ही भेट पावसाळी हंगामी मच्छीमारीसुरु ठेवण्य साठी असली तर दोषींना जशास तसं उत्तर द्यावं! अशी मागणीस्थानिक मच्छीमार बांधवां मधून जोर धरू लागली आहे.

# धावत्या बसमध्ये चोरी करणारा अटकेत

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर

मुंबई पूणे द्रुतगती महामार्गावर धावत्या खासगी ट्रॅव्हल्स बसमधील महिला प्रवाशांची पर्स चोरीतून लाखोंचा मुद्देमाल चोरणाऱ्या चोरट्याला कामोठे पोलिसांच्या पथकाने अखेर अटक करुन त्याची रवानगी तळोजा मध्यवर्ती कारागृहात केली. मूळ गुजरात येथे राहणारा आकाश पटेल असे या 32 वर्षीय संशयीत चोरट्याचे नाव आहे.
मार्च आणि एप्रिल महिन्यात चार वेगवेगळ्या चोरीच्या घटनांची नोंद महिला प्रवाशांनी कामोठे पोलीस ठाण्यात केली होती. एक सारख्याच पद्धतीने चोऱ्या वाढल्यामुळे कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी चोरट्याला पकडण्यासाठी खास पोलिस पथकाची नेमणूक केली.
अथक तपासानंतर अखेर लोणावळा येथील एका हॉटेलमध्ये संशयित थांबल्याची माहिती मिळाल्यानंतर कामोठे पोलिसांनी हॉटेलमधील वेटरचे कपडे घालून सापळा रचला. पहाटे सहा वाजता संशयित आल्यावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने 15 लाख रुपयांचा मुद्देमाल चोरल्याचे कबूल केले. आकाश हा सूरत (गुजरात) येथील बारडोली तालुक्यातील वराड या गावचा मूळ रहिवाशी आहे. आकाश हा द्रुतगती महामार्गावरील टोलनाक्याच्या काही अंतरापुढे स्वतःचे वाहन बिघडल्याचे सांगून खासगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसला थांबवून त्या बसमध्ये प्रवाशांप्रमाणे चढल्यानंतर सीट मोकळी आहे का हे बघण्याच्या बहाण्याने स्लीपर सीटसमोरील पडदे उघडून झोपलेल्या महिलांच्या पर्स चोरत होता. काही मिनिटांनी तो मागून त्याची मोटार येत असल्याचा बहाणा करून द्रुतगती महामार्गावरील दुसरा टोलनाका येण्याच्या पूर्वी बसमधून उतरत असे. त्यामुळे तो टोलनाक्यावरील सीसीटिव्ही कॅमेरांमध्ये कैद झाला नाही.

# कर्जतची "गायत्री आशा महेश बडेकर" आशिया पॉवरलिफ्टिंगची सुवर्णपदक विजेती

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

५ मे ते १२ मे २०२५ या कालावधीत आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशीप २०२५ स्पर्धा डेहराडून (उत्तराखंड) येथे घेण्यात आली. या स्पर्धेत दिनांक ०९ मे २०२५ रोजी आपल्या भारत देशातर्फे सब ज्युनिअर महिला(१९ वर्षाआतील) मध्ये IND वेटलिफ्टिंग - पॉवरलिफ्टिंग क्लब कर्जतची खेळाडू कु.गायत्री आशा महेश बडेकर हिने ४३किलो वजनीगटात सुवर्ण पदकासह सर्वोत्तम आशियाई पॉवरलिफ्टिंर किताब ३रा क्रमांक प्राप्त केला आहे. या स्पर्धेत स्कॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या तीन प्रकारात पूर्वीचे आशियाई विक्रम मोडून नवीन विक्रम आपल्या नावे करून आपल्या भारत देशाचे नाव उज्वल केले आहे. तसेच तिन्ही प्रकारात ३२५ किलो सर्वाधिक वजन उचलून नवीन विक्रम आपल्या नावे करून सध्याची आशिया खंडातली तसेच भारतातील एकमेव पॉवरलिफ्टर जिने स्कॉट,बेंच आणि डेडलिफ्ट आणि एकूण असे एकाच वेळी ४ ही प्रकारात विक्रम करून ४ सुवर्णपदके प्राप्त केली आहेत.



तिच्या या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड चे वतीने तिचे हार्दिक अभिनंदन करून यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.तसेच महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित सचिव "संजय प्रतापराव सरदेसाई"यांनी सुद्धा तिच्या अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. गायत्री बडेकर हिला राष्ट्रीय कुस्ती,वेटलिफ्टिंग पॉवरलिफ्टिंग खेळाडू हनुमंत खरात यांचे मोलाचे प्रशिक्षण/मार्गदर्शन लाभले आहे. तसेच प्रथमेश भालेकर, अंजली येवले यांचेही सरावासाठी सहकार्य लाभले गायत्री बडेकर ही एका मध्यमवर्गीय कुटुंबातील असून वडिलांचा रिक्षाचालकाचा व्यवसाय असून आपल्या मुलीने या खेळामध्ये चांगली प्रगती करावी असे तिचे वडील महेश बडेकर आणि आई आशा बडेकर यांना वाटते. आपल्या मुलीने मेहनतीने चार सुवर्णपदक मिळवली याचा आनंद खूप वाटतो झाला आहे. असे त्यांनी मत दिले. गायत्री बडेकर यांनी मिळवलेल्या यशामुळे आणखी एक महिला खेळाडू आंतरराष्ट्रीय पदक विजेती झाली याचा आनंद वाटतो. असे मत पॉवरलिफ्टिंग रायगडचे अध्यक्ष गिरीश शरद वेदक यांनी व्यक्त केले आहे.तर सलोनी मोरे, अमृता भगत या आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या महिला खेळाडूंच्या यादीत गायत्री आशा महेश बडेकर चा समावेश झाला आहे. याचा आनंद आहे. असे मत पॉवरलिफ्टिंग रायगडचे सचिव अरुण पाटकर आणि सहसचिव सचिन भालेराव यांनी व्यक्त केले. गायत्री बडेकर यांच्या कामगिरीमुळे त्यांची जागतिक स्पर्धेसाठी निवड झाल्याचे समजते.

# कामोठे पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल :वार्ताहर

कामोठे पोलिसांनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन राबवले. 12 मे रोजी सायंकाळी 7 ते 13 मे रोजी मध्यरात्री दीड वाजेपर्यंत कामोठे पोलीस ठाणे हद्दीत छोटा खांदा, मोठा खांदा, कामोठे गाव, जुहू गाव या भागामध्ये कोंबिंग ऑपरेशन राबवण्यात आले. तसेच शिवसेना चौक येथे नाकाबंदी करण्यात आली आणि ऑल आउट दरम्यान कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, चार सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, 23 अंमलदार, झोन टू स्ट्राइकिंग, आरसीपी पथक हजर होते. यावेळी पोलिसांनी बी एन एस 287 अंतर्गत दोन आणि बीएनएस 285 अंतर्गत गुन्हे दाखल केले. तसेच देशी दारू विक्री प्रकरणी कारवाई करण्यात आली. चार हिस्ट्रीशीटर चेक केले असता चारही जण मिळून आले. अभिलेखावरील नऊ आरोपी चेक केले असता चार सापडून आले. शिवसेना शाखा चौक येथे नाकाबंदी दरम्यान 124 वाहने चेक करण्यात आली. यातील 29 वाहनांवर मोटर वाहन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली. परिसरात परकीय नागरिक किंवा बांगलादेशी नागरिक यांचा शोध घेतला, मात्र सापडून आलेले नाहीत. अशाच प्रकारचे कोंबिंग ऑपरेशन यापुढे सुरू राहणार असल्याची माहिती विमल बिडवे, वपोनि यांनी दिली.



## कर्मचाऱ्यांच्या बदल्या तातडीने करा ;एकाच जागी वर्षानुवर्षे बसलेल्या कर्मचाऱ्यांमुळे अपहाराला खतपाणी; सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांची जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी

दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा

रायगड जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमध्ये एकाच टेबलावर पाच ते दहा वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या तातडीने करण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केली आहे. बदल्यांचे शासन निर्णय असूनही जिल्हा परिषद प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असून, त्यामुळे प्रशासकीय अपारदर्शकता आणि भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.शासन निर्णय धाब्यावर, काहींना 'विशेष सवलत'ग्रामीण विकास विभागाने १५ मे २०१४ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, कोणत्याही कर्मचाऱ्याने एका टेबलावर तीन वर्षांपेक्षा अधिक आणि एका विभागात पाच वर्षांपेक्षा जास्त काळ काम करता कामा नये. यानंतर त्यांची बदली करणे बंधनकारक आहे. मात्र, रायगड जिल्हा परिषदेत काही कर्मचारी ८ ते १२ वर्षांपर्यंत एकाच जागी कार्यरत असून, त्यांना पदाधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याचे दिसून येत आहे.साडेपाच कोटींच्या अपहाराचे उदाहरण ताजेच महेश गोपीनाथ मांडवकर या कर्मचाऱ्याने एकाच टेबलावर आठ वर्षे कार्यरत राहून साडेपाच कोटी रुपयांच्या वेतन फरकाचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे अशा दीर्घकाळ एकाच विभागात ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांची कारकीर्द आणि त्यांच्या कारवाया संशयाच्या भोवऱ्यात आल्या आहेत.सेवा ज्येष्ठता यादीतही अनियमितता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या सेवा ज्येष्ठता यादीत १२ वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच तालुक्यात कार्यरत असलेल्यांना सूट देण्यात आल्याची माहिती असून, ही सूट कोणत्या निकषांवर आधारित आहे, हे स्पष्ट केले गेलेले नाही. त्यामुळे पारदर्शकतेच्या दृष्टीनेही हा प्रकार संशयास्पद ठरतो.अपंग, विधवा, कुमारिका यांना सूट , पण इतरांना का? ७ मार्च २०१९ च्या शासन निर्णयानुसार, तीन वर्षांपेक्षा अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना विनंती बदलीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. या निर्णयात विधवा, अपंग, पती-पत्नी अशा विशिष्ट गटांना सूट आहे. मात्र, यापलीकडे इतर कर्मचाऱ्यांना सवलत देणे हे नियमनबाह्य ठरत असल्याचा मुद्दा सावंत यांनी उपस्थित केला आहे."बदल्या नाहीत, म्हणून अपहार आहे!"संजय सावंत म्हणाले, "बदल्या वेळच्या वेळी झाल्या नाहीत, म्हणूनच अपहाराचे प्रकार वाढत आहेत. नियमांचे उल्लंघन करून वर्षानुवर्षे एकाच टेबलावर बसवले गेलेल्यांची तत्काळ बदली व्हावी. हे केवळ प्रशासनाच्या शुचितेसाठी नव्हे, तर सामान्य जनतेच्या पैशांचे संरक्षण करण्यासाठीही अत्यावश्यक आहे."

# नेवासा शहरास पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरु करा

## नेवासा शहर काँग्रेसची नगरपंचायतकडे मागणी

दैनिक युवक आधार
नेवासा प्रतिनिधीः-
लखन वाल्हेकर

नेवासा शहरासाठी तातडीने टँकर सुरु करण्याची मागणी शहर काँग्रेसने नगरपंचायतकडे केली. ऐन कडाक्याच्या उन्हाळ्यात नेवासा शहरास पिण्याच्या पाण्याची मोठी उणीव भासत आहे.शहरातील अहिल्यानगर सारख्या प्रभागात सात ते आठ दिवसातून एकदाच तेही अर्धा तास पाणी येत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे.पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना खाजगी टँकर घेऊन पैसे मोजावे लागत आहे, नेवासा नगरपंचायतकडे विचारणा केल्यास नगरपंचायतसाठी पाणी साठविण्यासाठी ज्या क्षमतेची स्टोअर टाकी हवी ती नसल्यामुळे मुकिंदपूर ग्रामपंचायतकडून पाणी घेऊन ते पाणी शहराच्या काही भागास पुरवून पूर्तता करत आहोत तसेच वीज नेहमी जात असल्यामुळे पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे असे उत्तर दिले जाते. मुळातच पाण्याच्या बाबतीत नगरपंचायतचे योग्य नियोजन नाही, पाणी पट्ट्या भरमसाठ दिल्या पण पाणी देत नाही अशी चर्चा नागरीक करतात. नेवासा शहर काँग्रेसने जनतेच्या प्रश्नांची दखल घेत आज नगरपंचायतमध्ये जाऊन शहरासाठी टँकर सुरु करण्याची मागणी केली. यावेळी तातडीने टँकर सुरु न केल्यास शहर काँग्रेस आक्रमक भूमिका घेईल असा इशारा दिला. असे लेखी निवेदन देखील यावेळी देण्यात आले. निवेदनावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, शहराध्यक्ष अंजुम पटेल,शेतकरी संघटनेचे त्रिंबक भदगले बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण, स्वाभिमानी



संघांचे गणपत मोरे, गुलाब पठाण, संजय होडगर आदीसह शहरातील नागरिक उपस्थित होते.

# श्री. ब्रम्हचैतन्य मासिक संगीत सभा संपन्न

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ४२ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील श्री गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात सादर झालेल्या या कार्यक्रमात पुणे येथील गायिका श्रुती मंदार देव आणि स्नेहल अभिजीत जायदे ह्यांनी आपली गायन सेवा सादर केली.
श्रुती देव ह्यांनी संगीत सभेची सुरुवात शास्त्रीय गायनाने केली.
त्यानंतर दोघींनी 'भक्तिच्या फुलांचा', नंतर पुरिया धनश्री रागातील 'श्रीरामाचे चरण धरावे' हा अभंग, तसेच 'श्रीरामाच्या पूजेसाठीव', 'हरी भजना वीण काळ' हे अभंग सादर केले.
त्यानंतर त्यांनी 'नारायणा रमारमणा' आणि 'सोहम हर डमरू बाजे' ही नाट्यपदे आणि




'बाजे रे मुरलिया' हा अभंग सादर केला. 'धन्य भाग सेवा का' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमाला तबलासाथ जयंत कुलकर्णी तर हार्मोनियमची साथ राजेंद्र काळे यांनी केली. चैतन्य कोशे यानी तालवाद्यसाथ केली. जयमाला कुलकर्णी व समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. किरण गोखले यांनी ध्वनिसंयोजन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक व मठातील कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले.

## माहेरची वाट
(अभंग)

माहेरची वाट।
मनातला थाट ॥
मायेची ती लाट ।
शोधुनिया ॥

पावलोपावली ।
आठवणी मनी ॥
डोळ्यांतूनी पाणी ।
अश्रुधारी ॥

माहेरची ओढ ।
गंध तो मातीचा ॥
सुगंध तयाचा ।
घेऊनिया ॥

दाराशी ती उभी ।
माया ती पारखी॥
हाक तीओळखी ।
मनातुनी ॥

पंख दिले तिने ।
घर साद घाले ॥
मन माझे बोले ।
ओथंबुनी॥

वाटेवर सूर्य।
लाख ते किरणे॥
स्मृतीचे फिरणे।
स्पर्शुनिया॥

तुळशी वृंदावन।
अंगणी शोभतो॥
सडा तो पडतो।
भक्तीतुनी॥

पाखरांचा बोल।
गोष्टीचाच पूर॥
चुलीवरी धूर।
निघोनिया॥

**प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर
( रमाईसुत ).
छत्रपती संभाजीनगर**

## उभाटाचा बोभाटा

कुणाच्या खांद्यावर
कुणाच ओझ?
कोण कुणाचे
ओढतोय पाय?
खुर्ची साठी
सगळेच लाचार
काका पुतण्याच
जवळ जवळ जुळलय
उभाटाच्या ताटात
पडलय आता भोक
आपण दोघ भाऊ भाऊ
एकत्र येवुन खाऊ
राजकारणाच्या पटलावर
पडतय नवीन पाऊल

**कविता सुनिल
शांताराम पेंडुरकर**